वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि.२५ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## आतील पानावर वाचा

* तत्कालीन निवडणूकीत एमआयएम चिन्ह
* शेख निजाम यांची जबाबदारी
* मुजीब भाई यांचे किंगमेकर



# वाल्मिक कराड जेलमध्ये असल्यामुळेच झालेल्या या निवडणुकीत एका गरीब कुटूंबातील मिस्त्री काम करणारा व्यक्ती झाला नगरसेवक

## सामान्य घरातला व्यक्ती नगरसेवक झाल्याने आ.धनंजय मुंडेना चांगलाच धक्का बसला असेल

## वक्त बदलते देर नहीं लगती, जब पलड़ा भारी हो जाए तो इतिहास बनता है।



परळी (दिव्य न्युज):- परळी नगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काही अपेक्षित तर काही अनपेक्षित आणि धक्कादायक निकाल लागले. त्यात शहराच्या प्रभाग क्रमांक ३-अ मधील निकालाने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले आहे. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि रिपाई या सर्व पक्षांचा संयुक्त आणि अत्यंत तगडा उमेदवार रिंगणात असताना, काँग्रेसच्या 'पंजा' या चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या फरशी कारागीर असलेल्या तरुण फारुख गणी सय्यद उर्फ बब्बू यांनी एकहाती विजय मिळवत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

या प्रभागातून माजी उपनगराध्यक्ष आयुब पठाण आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवा नेते अजीम नवाब हे ही निवडणूक रिंगणात होते. मात्र, त्यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. महायुतीचा उमेदवार एकतर्फी निवडून येईल, असे चित्र असतानाच काँग्रेसच्या उमेदवाराने विजयश्री खेचून आणली.

ऑफर, दबाव पण निर्णय ठाम!

निवडणूक प्रक्रियेदरम्यान फारुख गणी सय्यद यांना उमेदवारी मागे घेण्यासाठी अनेक ऑफर देण्यात आल्या, दबावही टाकण्यात आला. मात्र, कशालाही भीक न घालता त्यांनी निर्भीडपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि तो यशस्वीही ठरवला.

कार्यकर्त्यांशिवाय प्रचारफारुख सय्यद हे स्वतः फरशी कारागीर म्हणून मजुरी करून उदरनिर्वाह करतात. प्रचारासाठी मोठी यंत्रणा, कार्यकर्ते किंवा खर्च करण्याची क्षमता त्यांच्याकडे नव्हती. अनेकवेळा प्रचारासाठी त्यांच्या सोबत कोणीच नसत.मतदारांकडूनच त्यांना चहा,नाश्ता झाल्याच्या घटना घडल्या. काही वेळा तर प्रतिस्पर्धी उमेदवारांनीही त्यांना चहा-नाश्ता केल्याची चर्चा नागरिकांत होती.काँग्रेस पक्षाकडून मिळालेली हँडबिले स्वतः मतदारांपर्यंत पोहोचवून, हात जोडून एकदा निवडून द्या हेच त्यांचे प्रचाराचे प्रमुख साधन होते. थेट संपर्क, साधेपणा आणि प्रामाणिकपणामुळे मतदारांनी त्यांना मनापासून साथ दिली.

मी निवडून आलोय, आत जाऊ द्या

मतमोजणीनंतर विजयाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी ते नगरपालिकेत गेले असता, त्यांना कोणी ओळखत नसल्याने पोलिसांनी अडवले.मी निवडून आलो आहे, मला प्रमाणपत्र घ्यायचे आहे, मला आत जाऊ द्या, असे त्यांना सांगावे लागले. आजूबाजूच्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी ओळख पटवल्यानंतरच त्यांना आत सोडण्यात आले.विशेष म्हणजे मतमोजणीला जातानाही त्यांच्यासोबत प्रतिनिधी नव्हता. त्यांची फेरमतमोजणी झाली, हेही त्यांना नंतर समजले. अखेर ७२ मतांच्या फरकाने त्यांनी विजय मिळवला.

### शुन्य खर्चात मोठा विजय

फारुख गणी सय्यद यांचा संपूर्ण निवडणूक खर्च जवळपास केवळ उमेदवारी अर्ज भरण्यापुरताच मर्यादित राहिला. मतदारांनीच खर्च करून निवडून आणलेला उमेदवार म्हणून त्यांची चर्चा सुरू आहे. अमाप पैसा खर्च करूनही अनेकांना पराभव पत्करावा लागतो, मात्र फारुख सय्यद यांनी जवळजवळ शून्य खर्चात विजय मिळवून नवा आदर्श निर्माण केला आहे.


### जनतेसाठी प्रामाणिक काम करण्याचा निर्धार

विजयानंतर प्रतिक्रिया देताना फारुख गणी सय्यद उर्फ बब्बू म्हणाले,मी फरशी कारागीर आहे. पोटासाठी मला काम करावेच लागणार आहे. मात्र माझे काम सांभाळून मी जनतेच्या कामासाठी वेळ देणार आहे. पाणी, नाली, रस्ते आणि वीज या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करणार आहे.परळीच्या राजकीय इतिहासात एका साध्या फरशी कारागीराने दिलेला हा धक्का, सध्या संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरत असून 'ना मसल, ना मनी पॉवर' असतानाही जिद्द, प्रामाणिकपणा आणि जनतेचा विश्वास किती मोठा चमत्कार घडवू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण ठरत आहे.




बीड : बीड नगर पालिकेच्या प्रभाग क्रं. १७ मधून निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक शेख बिलाल यांनी आज कश्मकश, दिव्य वार्ता कार्यालयाला भेट दिली असता त्यांचा कार्यालयात हार, शाल, पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करत शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी रफिक बागवान, बीड जिल्हा क्रिकेट असोसियशनचे सदस्य इरफान शेठ कुरेशी व संपादक मोहंमद अबुबकर.

# जमीन मोजणी कार्यालयातील कर्मचारी नेहमीच कर्तव्यावर गैरहजर



जिंतूर, (दिव्य न्युज):- येथील भुमिअभिलेख(जमीन मोजणी) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे नेहमीच कार्यालयात गैरहजर राहतात त्या मुळे ग्रामीण भागातून आलेल्या अनेक शेतकऱ्यांना जमीन मोजणीची फी भरल्यानंतर ही त्याचे कामे होत नाही दिवसभर शेतकरी व सामान्य नागरीक कार्यालयात चकरा मारून- मारून हैराण झाले होते. या बाबत भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष गोविंद थिटे यांच्याकडे नागरिकांनी तक्रार केली असता त्यांनी थेट तहसील कार्यालयामध्ये जाऊन तहसीलदार यांच्याकडे याबाबत लिखित तक्रार दिली त्यानुसार जिंतूरच्या तहसीलदार शितल कच्छवे मॅडम यांनी मंडलअधिकारी एम ए पठाण व जिंतूर चे तलाठी भालेराव यांना त्या कार्यालयात पाठवून कामावर गैरहजर असल्याबाबत पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते त्यानुसार मंडलअधिकारी व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालयात जाऊन पंचनामा केला असता अनेक कर्मचारी कामावर गैरहजर होते असे निदर्शनास आले संबंधित कार्यातील अधिकारी व कर्मचारी नेहमीच काहीतरी बहाने लावून कार्यालयात अनुपस्थित राहतात व नागरीकांच्या कामांना प्राध्यान देत नाही अश्या कामचुकार कर्मचाऱ्यावर शिस्तभगाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहेत.

## नगराध्यक्ष पदासाठी कोणाला कोणत्या प्रभागातून किती लिड मिळाली

| प्रभाग क्रमांक | कमळ | घडी | तुतारी | पतंग | लीड |
|---|---|---|---|---|---|
| १) | १२३३ | ४२० | १०७६ | ९ | भाजप - १५७ |
| २) | २६८८ | २९५ | १४५९ | ८ | भाजप - १२२९ |
| ३) | २०४९ | १६७० | ५०५ | ५९ | भाजप - ३७९ |
| ४) | १८१९ | ६४५ | १४८४ | १७ | भाजप - ३३५ |
| ५) | २८४५ | ७९१ | ६१५ | ४३ | भाजप - २०५४ |
| ६) | ११०४ | २२९३ | ११०२ | ६६८ | घडी - ११८९ |
| ७) | २६६५ | ४४८ | ६१४ | २१ | भाजप - २०५१ |
| ८) | १४३५ | ११०६ | ८६९ | ३९ | भाजप - ३२९ |
| ९) | १०६७ | १३३४ | १५११ | ४९ | तुतारी - १७७ |
| १०) | १४५९ | ३१२ | ६५९ | २० | भाजप - ११४७ |
| ११) | ७२५ | १९१० | १००६ | १६२ | घडी - ९०४ |
| १२) | १४१६ | १४५२ | १२७३ | १६२ | घडी - ३६ |
| १३) | १३०० | ७०१ | ८२१ | ३९ | भाजप - ४७९ |
| १४) | १२०१ | ६०९ | १३४१ | ०३ | तुतारी - १४० |
| १५) | १४७० | २४६ | ८८६ | ०७ | भाजप - ५८४ |
| १६) | ४१४ | २५९९ | १०६१ | ७५ | घडी - १५३८ |
| १७) | ६९४ | २१४१ | १३६९ | ३१७ | घडी - ७७२ |
| १८) | ४१९ | २६५४ | १२३७ | ५०५ | घडी - १४१७ |
| १९) | १०८० | १६३४ | ८२२ | १८२ | घडी - ५५४ |
| २०) | २९२ | २११६ | ८३५ | ५५४ | घडी - १२८१ |
| २१) | ५८९ | १५१३ | १११७ | २०३ | घडी - ३९६ |
| २२) | ४८ | २०८२ | ७४३ | ५८३ | घडी - १३३९ |
| २३) | ७५ | २८८८ | ८६८ | ८९९ | घडी - १९८९ |
| २४) | ७४३ | १४६९ | ६१९ | ३५४ | घडी - ७२६ |
| २५) | १६३४ | ८७४ | ९३० | ०१ | कमळ - ७०४ |
| २६) | ९५९ | १६५२ | ६०९ | ३११ | घडी - ६९३ |

वरील प्रमाणे मतदान नगराध्यक्ष पदासाठी झालेले असून त्यामध्ये भाजपला प्रभाग क्रमांक १ ते ५, ७, ८, १०, १३, १५ आणि २५ मधून लीड आहे. घडीला प्रभाग क्रमांक ६, प्रभाग क्रमांक ११ ते २४ आणि प्रभाग क्रमांक २६ मधून लीड आहे तर तुतारीला केवळ प्रभाग क्रमांक ९ आणि प्रभाग क्रमांक १४ मधून लीड असल्याचे या आकडेवारीवरुन दिसून येते.





बीड : येथील सहाय्यक रचनाकार असलेले एजाज खान यांचा आज वाढदिवस त्यानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा न्यायाधिश फारूक ख्वाजा साहेब सोबत पिपल्स एज्युकेशन संस्थेचे सचिव मुश्ताक अन्सारी, एमआयएमचे जेष्ठ नेते अब्दुल सलाम शेठ, शासकीय गुत्तेदार शेख मोईन, सय्यद अमिनुज्जमा, मुद्दसीर शेठ सह इत्यादी मान्यावर उपस्थित होते. यावेळी सर्वांच्या वतीने एजाज खान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कश्मकश, दिव्य वार्ता परिवारातर्फे ही त्यांना वाढदिवसाच्या खूप खुप शुभेच्छा

# पुतण्याकडूनही मंत्री क्षीरसागरांची अपेक्षा

बीड, (दिव्य न्युज):- एकेकाळी राज्यातील प्रमुख ओबीसी नेते आणि जिल्ह्याच्या राजकारणातील प्रमुख नेते असलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर तीन वर्षांपासून पक्षाविना आहेत. नगरपालिका निवडणुकीत त्यांनी भाजपचा प्रचार केला; पण त्यांना मुख्यमंत्र्यांच्या व्यासपीठापासून दूर रहावे लागले. आता तर ज्यांच्यासाठी त्यांनी निवडणुकीत जिवाचे रान केले ते पुतणे डॉ. योगेश क्षीरसागरांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करणाऱ्या समाज माध्यमांवरील पोस्टच्या बॅनरवरही त्यांच्या फोटोला स्थान नाही. तीन वर्षांपूर्वी क्षीरसागर यांच्यावर शिवसेनेने कारवाई केली. त्यावेळी डॉ. भारतभूषण क्षीरसागर व डॉ. योगेश क्षीरसागर सोबतच होते; पण नंतर डॉ. क्षीरसागरांनी काका जयदत्त

क्षीरसागरांची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काका मात्र पक्षाविनाच होते. नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर सुरवातीला त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाच्या चर्चा सुरू असतानाच पुणते डॉ. योगेश यांनीच राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजप गाठले. दरम्यान, निवडणुकीतही पुतणे भाजपचे नेतृत्व करत असल्याने त्यांनी पुतण्याची साथ दिली आणि विविध ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. त्यावेळीही पक्षाच्या मुख्य बॅनरवर त्यांचा फोटो नव्हता.

समर्थकांना पडले कोडे

डॉ. योगेश क्षीरसागर यांनी विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करणारी पोस्ट आपल्या अधिकृत समाज माध्यमावर टाकली. यात भाजपचे प्रमुख नेते, दिवंगत काकू व नाना, वडिलांच्या फोटोसह भाजपमधील बीडचे स्थानिक नेते आणि नगराध्यक्षपदाच्या पराभूत उमेदवारांच्या फोटोला जागा दिली. मात्र, काका जयदत्त क्षीरसागर यांचा फोटो टाळला. एकीकडे बडे पक्ष टाळत असताना आता पुतण्याही क्षीरसागरांना बायपास का करत आहेत, याचे कोडे क्षीरसागरांच्या समर्थकांना पडले आहे.

# प्रभाग क्रं.२२ मधून शेख निजाम यांच्या विजयामुळे प्रभागाचा विकास भरून निघणार

# शेख निजाम यांची जबाबदारी आता वाढली

## प्रभागच नव्हे तर माजी आ.अमरसिंह पंडित अन् आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा बंद पडलेला विकास जलद गतीने पूर्ण करावे लागणार

### या दोन्हीही राजेंनी आता निजाम सारख्या खमक्या नेतृत्वाला विकासाची ताकद देणे गरजेचे



**बीड (दिव्य न्युज):– नुकत्याच झालेल्या बीड नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दणदणीत विजय मिळवत नगराध्यक्ष पदासह १९ नगरसेवक निवडून आणले आहेत. बीड शहरातील पेठ बीड भागाला प्रथमच प्रथम नागरीकतेचा मान नगराध्यक्षाच्या रूपाने प्रेमलता पारवे यांच्यामुळे मिळाला आहे. आता पेठ बीडचा विकास गतीने आणि पुर्ण क्षमतेने होईल यामध्ये काडीमात्र शंका नाही. पेठ बीडमधून अनेक वजनदार आणि अभ्यासू नगरसेवक निवडून आले आहेत. यामध्ये एक असा प्रभाग आहे ज्या प्रभागाने विकास काय असतो याचा तोंडच पहिलेले नाही.**

प्रभागाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. ना प्यायला चांगले पाणी, ना नाली, ना निट नाटके रस्ते रात्र झाल्यावर हा परिसर एक खेड्या गावासारखा दिसून येतो. परिसरात स्वच्छतेचे तिन तेरा झालेले आहेत. अशातच झालेल्या निवडणूकीत या प्रभागतील मतदारांनी चांगला निर्णय घेत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना भरभरून मतदान करत विजय मिळवून दिला. या विजयी उमेदवाराचे नाव आहे शेख निजाम हाजी जैनोद्दीन शेठ.... निजामा यांच्या या विजयामुळे प्रभागाचा थांबलेला आणि बंद पडलेला विकास आता पूर्ण क्षमतेने आणि मोठ्या गतीने येणाऱ्या पाच वर्षात पुर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. शेख निजाम यांना नगर पालिकेचा दांडगा अनुभव आहे. निजाम हे या पुर्वी तिनदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत. पालिकेत ते बांधकाम सभापती, नियोजन सभापती ते स्थायी समितीचे सदस्य राहिलेले आहेत. पालिकेत त्यांना अनुभवी नगरसेवक म्हणुन ओळखले जाते. पेठ बीडमधन निजाम निवडून आल्याने आता पेठ बीडचा विकास मोठ्या झपाट्याने पुर्ण होईल कारण बीड नगर पालिकेचे नगराध्यक्ष सौ. प्रेमलतताई पारवे ह्या पेठ बीडच्याच रहिवाशी आहेत याचा पुर्ण फायदा पेठ बीडला आणि शेख निजाम यांना मिळणार आहे. शेख निजाम हे ज्या प्रभागातून निवडून आले त्या प्रभागातून त्यांना विकास करण्यासाठी डीपीआर बनवावे लागेल. याचमुळे या प्रभागाचा विकास भरून निघेल. नवीन प्रभाग असल्याने या प्रभागात समस्या-समस्या आहेत. रस्ता, नाली. स्वच्छ पाणी, स्वच्छता, विद्युत पोल आणि स्मशानभुमी, दफनविधी सह दर्गाह हजरत शहेंशाहवली यांच्या दर्गा परिसरात विकास करावाचा लागेल. निजाम यांच्या अभ्यासूपणामुळे या प्रभागाचा येणाऱ्या पाच वर्षात विकास आणि कायपालट झालेली दिसून येईल. नगरसेवक नसतांनाही निजाम यांनी या प्रभागाकडे बारकाईने लक्ष ठेवले होते. शासनाच्या विविध योजनेतून त्यांनी निधी मिळविला. त्या निधीतून निवडून येण्यापुर्वीच अनेक दर्जेदार सिमेंट रस्ते केले.मुलभुत सुविधा मिळवून देणे हेच कर्तव्य न समजता त्यांनी या परिसरातील मुला मुलींना चागले आणि उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी अत्यंत हुशार आणि अभ्यासू शिक्षकांना सोबत घेवून मोठी टोलेजंग शाळेची इमारत उभी करून दर्जेदार शिक्षण द्यायला. मागील काही वर्षापासून सुरूवात केली आहे. यामुळे या परिसरातील मुला मुलींना उच्च आणि दर्जाचे शिक्षण मिळत आहे. निजाम यांच्यावर प्रभागच नव्हे तर पेठ बीडच्या विकासाची जबाबदारी आली आहे. पेठ बीड हा विकासापासून कोसो दुरू आहे. पेठ बीडमध्ये एकह भाजी मंडई नाही, मटन मार्केट नाही, फळ विक्रेत्यांना बसण्यासाठी जागा नाही, अग्निशामन विभाग नाही, कडबा मंडी आणि आठवडी बाजारची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अवस्थच्छेमध्ये बसून भाजी विक्रेत्यांना फळभाजी विक्री करावे लागते. यामुळै या परिसरातील नागरीकांच्या आरोग्य धोक्यात आले आहे तसेच या परिसरात एकही चांगले आणि उच्च दर्जोचे उद्यान नाही. पेठ बीड भागामध्ये एकही शासकीय दवाखाना नसल्याने रात्री अपरात्री या परिसरातील नागरीकांची प्रकृती बिघडल्यावर पेठ बीडमधून बीड शहरात जावे लागले. खास करून महिलांना आणि वृध्दांना अन् लहान मुलांना याचा सर्वात जास्त त्रास आहे. म्हणुन या परिसरात बीड नगर पालिकेच्या वतीने एक उच्च दर्जाचे ओपीडी आणि आयपीडी रूग्णालय असणे आवश्यक आहे. पेठ बीडमध्ये अग्निशामन विभाग ही असणे गरजेचे असून त्यासोबत रूग्णवाहिकाही असणे आवश्यक आहे. रूग्णवाहिका असल्यास रूग्णांना याचा फायदा मिळेल आणि पेठ बीडमधून बीडच्या शासकीय रूग्णालय किंवा अन्य रूग्णालयात जाण्यासाठी रात्री अपरात्री रिक्षा किंवा अन्य वाहनांची वाहट पाहणी लागणार नाही. आता शेख निजाम यांच्यासारखा हुशार आणि अभ्यासू नगरसवेक या परिसरातून निवडून आल्यानें त्याच्याकडून आता पेठबीड करांची अपेक्षा आहे पण त्यासाठी शेख निजाम यांना ताकदी मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी माजी आ.अमरसिंह पंडित आणि आ.विजयराजे पंडित यांनी शेख निजाम यांच्यासारख्या खमक्या नेतृत्वाला आता ताकद देणे गरजेचे असून या दोन्ही पंडितांची ताकद शेख निजाम यांना मिळाली तर पेठ बीडच काया पालट झाल्याशिवाय राहणार नाही... कारण अभ्यासू युवकाला अभ्यासू असणाऱ्या नेतृत्वाची ताकद मिळाली तर या परिसराचा विकास पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. या परिसरातील नागरीकांचा अशा आता शेख निजाम यांच्यासारख्या अभ्यासू नेतृत्वाकडे लागली आहे. अपेक्षा आहे की शेख निजाम हे पेठ बीड परिसराचा विकास आणि कार्यापालट माजी आ.अमरसिंह पंडित, आ.विजयराजे पंडित, नगराध्यक्षा सौ.प्रेमलता पारवे आणि शेख मुजीब यांच्या साथीने पुर्ण करतील हीच पेठ बीडकरांची अपेक्षा......

# मुजीबभाई यांच्या निवडणुकीचे वकील सर ठरले खरे किंगमेकर

### उमेदवारी मिळण्यापासून ते विजय प्राप्तीपर्यंत वकिलसरांनी मुजीब भाईंना दिली मोलाची साथ



बीड, (दिव्य न्युज):– नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीत अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दणदणीत विजय झाला. याच अजितदादा पवार यांच्या पक्षाची झालेल्या विधानसभा निवडणूकीत अवस्था एकदमच बिकट होती. त्या निवडणूकीत मुस्लिम समाज या पक्षापासून चार हात लांब राहिला. लोकसभेची निवडणुक असो की विधानसभेची निवडणुक मुस्लिम समाजाने अजितदादा यांच्या पक्षाला कडाडून विरोध करत शरद पवारयांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरभरून मतदान करत विजय प्राप्त करून दिला. यामध्ये मुस्लिम समाजाचा सर्वात मोठा वाटा राहिलेला आहे. आ.संदीप क्षीरसागर जेव्हा दुसऱ्यांना विधानसभेच्या निवडणुकीसाठी रिंगणात उतरले तेव्हा संपूर्ण मतदार संघात संदीप क्षीरसागर यांच्या विषयी उलट सुलट चर्चा होती. त्याचे कारण ही असे की त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात म्हणजे संपूर्ण पाच वर्षात त्यांच्या अनेक समर्थकांनी त्यांची साथ सोडली होती. एवढेच काय त्यांचे वडील आणि त्यांच्या सख्ख्या भावानेही संदीप क्षीरसागरांना निवडणुकीत साथ न देता डॉ.योगेश क्षीरसागर यांचा प्रचार केला. एवढा विरोध असूनही संदीप क्षीरसागर दुसऱ्यांना बीड विधानसभेचे आमदार झाले ते फक्त आणि फक्त मुस्लिम मतांवर .... तेव्हा याच संदीप क्षीरसागरांसोबत भक्कम साथ होती तो म्हणजे वकिल सरांची....पण या नगर पालिका निवडणुकीत मोठ्या घडामोडी घडल्या. प्रथम संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून शेख मुजीब यांच्या पत्नीला पक्षाने उमेदवारी द्यावी या साठी वकिलसरांनी आपली प्रतिष्ठापणाला लावली. त्यांनी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलिम यांच्याकडे सतत पाठपुरवा सुरू केला.याममध्ये काही प्रमाणात त्यांना यश येत होते. पण अचानक रित्या शेख मुजीब यांनी आपल्या पत्नी ऐवजी सासूला उमेदवारी द्यावी असे सांगताच दोन्ही ही आजी माजी आमदारांनी याकडे दुर्लक्ष करायला सुरूवात केली. तेथूनच संघर्षाला सुरूवात झाली. अचानक रित्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शेख मुजीब यांच्याशी संपर्क साधत तेथूनच या राजकीय खेळ खेळीला सुरूवात झाली. त्या भेटीच्या वेळी शेख मुजीब यांच्या बाजुने वकिलसर यांनी मोठी वकालत केली आणि मुजीब भाई यांना शरद पवार यांच्या पक्षाची उमेदवारी न मिळता अजित पवार यांच्या पक्षाची उमेदवारी मिळाली. उमेदवारी मिळाल्यानंतर संपूर्ण प्रचारात वकिल सर यांनी महत्वाची भुमिका निभावली कारण, वकिलसर यांना विधानसभेच्या निवडणुकीत कशा पध्दतीने रणनिती ठरविली जाते याचा दांडगा अभ्यास झाला होता. त्याचाच परिपूर्ण फायदा उचलत वकिलसरांनी मुजीब भाई यांची प्रचार यंत्रणा राबविण्याचे ठरविले आणि त्यामध्ये त्यांना यशही आले आणि ना होते ते होते झाले बघता बघता एका साय दैनिकाचा संपादक आपल्या सासूच्या रूपाने बीड शहराचा प्रथम नागरीक झाला. खरोखरच या मुजीबभाईच्या संपूर्ण निवडणुकीचे किंगमेकर ठरले ते वकिल सर..... अशीच काहीशी चर्चा बीड शहरात होत आहे.

# सादेक अली यांच्या सहाव्यांदा विजयाचे आमीन जमा ठरले खरे बादशाह

### एकच पक्ष अन् एकाच चिन्हावर सहा निवडणूका जिंकणे सोपे नव्हे ...

## अमीन जमा यांचा प्रभागात असलेला जनसंपर्क आणि युवकांची मैत्री निवडणूकीत सादेक अली यांच्या आले कामी



बीड, (दिव्य न्युज):– बीड शहरातील प्रभाग क्रं.१९ मधून याही वेळी सादेक अली यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. सादेक अली मागील २५ वर्षापासून या प्रभागाचे नगरसेवक राहिलेत. या पुर्वी त्याचे मोठे बंधू हाजी फक्रूजमा हे नगरसेवक होते. त्यापुर्वी त्यांचे चुलते स्व.अजहर अली मुनशी हे या प्रभागाचे नगरसेवक राहिले आहेत. या प्रभागात जमा परिवारांची कौटूंबिक परंपरा सतत सुरू आहे. या निवडणुकीत सय्यद सादेक अली यांनी सहाव्यांदा विजय प्राप्त करून एकच पक्ष आणि एकच चिन्ह इतिहास घडविला. या निवडणुकीत सादेक अली यांचे लहाने चि.सय्यद अमिन जमा यांचा निवडणुकीत केलेले नियोजन आणि राबविलेली प्रचार यंत्रणा सादेक अली यांच्या कामी आली. अमिनजमा यांना मागील निवडणुकीचा अनुभव होता, वडीलांच्या आणि आपल्या काकांच्या पाऊलावर पाऊल ठेवून त्यांनी शांत डोक्यानी आणि संयमाने या निवडणुकीत आपल्या वडिलांना मोलाची साथ दिली. अमिनजमा यांना या प्रभागात मानणारा युवक मोठ्या प्रमाणात आहे. अत्यंत शांत,संयमी आणि प्रत्येकांशी प्रेमाने बोलणारा युवक म्हणून अमिनजमा यांची प्रभागच नव्हे तर संपूर्ण शहरभरात ओळख आहे. लहान असो की मोठा सर्वांशी आदराने आणि प्रेमाने बोलणारा युवक म्हणुन आमिनजमा यांच्याकडे पाहिले जाते. या निवडणुकीत अमिनजमा यांनी नियोजन करून प्रचार यंत्रणा आपल्या स्वतःच्या हातात घेत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे म.संचालक सय्यद नवीदुज्जमा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संपूर्ण प्रभागात प्रचार केला. या प्रभागात आमिनजमा यांना मानणारा मोठा वर्ग असून अनेक युवक त्यांच्या सोबतीला होते. प्रत्येकांच्या सुख दुःखात नेहमी पुढे असणारे आमिनजमा यांचे हे काम आज त्यांच्या वडीलांच्या निवडणुकीत त्यांच्या कामी आले. अत्यंत शांत आणि संयमी आमिनजमा यांच्या नियोजन बध्द प्रचारामुळेच सय्यद सादेक अली या निवडणूकीत नगरसेवक होवून सहाव्यांदा नगरसेवक होण्याचा मार्ग पटकाविला. म्हणूनच सादेक अली यांच्या या निवडणुकीचे खरे बादशाह ठरले तो म्हणजे आमिनजमा....

# तत्कालिन निवडणूकीत एमआयएमच्या चिन्हावर निवडून आलेल्या त्या दहा नगरसेवकांना मतदारांनी दाखविला कायमचाच घराचा रस्ता

## पाच वर्षे विकासाकडे दुर्लक्ष करत स्वतःच्या विकासाकडे लक्ष देणाऱ्या या दहा नगरसेवकांना चांगलाच दणका बसला...

**झालेल्या निवडणूकीत पुन्हा एकदा मोठ्या ताकदीने आणि मोठ्या शक्तीने मतदारांनी त्या १३ बहाद्दुरांना पुन्हा नगरसेवक करत नगर पालिकेच्या सभागृहात पाठवून त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला**

**झालेल्या निवडणुकीत प्रभागाकडे दुर्लक्ष करणारे आणि मतदारांशी संपर्क संपुष्टात आणणाऱ्या १४ नगरसेवकांना मतदारांनी चांगला हिसका दाखवत पराभूत करून टाकले**

**या निवडणूकीत मागील पाच वर्षात पालिकेत एकहाती सत्ता भोगणारे नगराध्यक्ष डॉ.भारतभुषण क्षीरसागर आणि उपनगराध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर निवडणूकीच्या रिंगणातून बाहेरच**

## या नवीन निवडून आलेल्या नगरसेवक आणि नगराध्यक्षांवर आता मोठी जबाबदारी विकासाची आहे

### निवडणुकीच्या रिंगणातून हे नगरसेवक बाहेरच

मागील पाच वर्षात नगरसेवक म्हणुन निवडून आलेले नगरसेवक वैशाली घाडगे, बिभिषण लांडगे, रविंद्र कदम, विकास जोगदंड, रमेश चांदणे, राजेंद्र काळे, आमेर अण्णा, राजेश क्षीरसागर, पिंगळे बाजीराव, तांदळे बन्सीधर, सईद चाऊस, संतोष गायवाकड, नरसिंग नाईकवाडे, विटकर लक्ष्मण, युवराज कदम, डॉ.योगेश क्षीरसागर निवडणूकीच्या रिंगणात दिसलेच नाही... का?

### हे १३ बहाद्दुर नगरसेवक पुन्हा सभागृहात

सय्यद सादेक अली, अमर नाईकवाडे, फारूक पटेल, बाळासाहेब गुंजाळ, मिनाबाई रणजिंसिंह चौहाण, जैतुल्ला खान, सय्यद इलियास, विनोद मुळूक, भैय्यासाहेब मोरे, रणजित बनसोडे, संजय उडाण,शुभम धूत

### हे नगरसेवक पराभूत झाले

भास्कर जाधव,विष्णू वाघमारे, बाबुराव दुधाळ, सम्राटसिंह चौहाण, जलीलखान पठाण, प्रभाकर पोपळे, रमेश चव्हाण, भिमराव वाघचौरे, विलास विधाते, अक्रम बागवान, सतिष पवार, मुखीद लाला, गणेश वाघमारे, शेख एकबाल

### एमआयएमचे ते दहा नगरसेवक कायमचेच घरी गेले

मुन्ना इनामदार, शेख अमर, शेख समी, सोनू शेठ, बाबा शेख, डॉ.इद्रिस हाश्मी हे निवडणुक न लढताच बाजुला गेले तर हाफेज अशफाक, मोमीन अजहर, शेख मतीन, शेख मोहंमद सादेक यांना मात्र मतदारांनी साफ नकारले

**शहराचा विकास अत्यंत बिकट झाला असून तो विकास पूर्ण करणे आता यांची जबाबदारी आहे**

**बीड शहरात क्रिडांगण उद्याने, वॉटर पार्क, सार्वजनिक शौचालय, अग्निशामन, आठवडी बाजार, भाजी मंडई, मटन मार्केट, फिश मार्केट, पालिकाचे रूग्णालय, कडबा मंडई, वॉकींट ट्रॅक या सर्वांची अवस्था अत्यंत दयनीय झाली तर पालिकेचे एकही रूग्णालय नाही, याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे**

**बीड शहरकरांना मुबलक आणि अत्यंत स्वच्छ पाणी मिळावे यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने ११४ कोटींची अमृत योजना दिली पण त्याचा पूर्णतः बट्ट्याबोळ झाला**

पालिकेत प्रशासकाच्या कार्यकाळात झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करणे गरजेचे असून या काळात बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, स्वच्छता विभाग आणि पुरवठा विभागातुन मोठ्या प्रमाणात बोगसगिरी करून गैरकामे करत लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने करोडोंची बिले उचलली आहे.






# जिंतूर तहसील कार्यालय ग्राहक दिन उत्साहात साजरा

जिंतूर , (दिव्य न्युज):-२४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून जिंतूर तहसील कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मनच्यावर अध्यक्ष म्हणून तहसीलदार शीतल कच्छवे मॅडम व महिला तालुकाध्यक्ष आशाताई खिल्लारे, सचिव सचिन रायपत्रीवार, विधी सल्लागार अँड रमेश वाकळे, दिलीप देवकर, महेश देशमुख, आशिष कळमकर सावजी यांच्या सह ग्राहक पंचायतचे सदस्य सह ग्राहक उपस्थित होते.

ग्राहकांना हक्कांची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्कांबाबत सक्षम व्हावा, यासाठी विविध संघटना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जागरुकता निर्माण करतात. यासाठीच २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. त्याच प्रमाणे जिंतूर तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ग्राहक कसा जागृत असायला हवा त्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

आखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयात विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत जागतिक ग्राहक दिन बुधवार २४ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला. अखिल भारतीय ग्राहक पंचायत सर्व पदाधिकारी सदर कर्यक्रमात मोठया प्रमाणात विविध संघटनेचे पदाधिकारी व नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला यात




यांच्यासह तहसील कार्यालयाचे मनोज कारंजकर, संदीप खापरे, अनिकेत घुगे, नजीर पठाण यांची यावेळी कार्यक्रमास उपस्थिती होती यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप देवकर यांनी केले तर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०